Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

शाअमविऔ/अंतगुणहमीकक्ष/२०२२-२३/ दिनांक : २९ ऑगस्ट २०२२

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ रोजी होणाऱ्या बैठकीची विषय पत्रिका : बैठक-१

१. मागील वर्षीच्या अंतिम सभेच्या इतिवृत्तास व कार्यवृत्तास मान्यता देणे.
२. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या दिनदर्शिकेला (Academic Calendar ला) मान्यता देणे.
३. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी शैक्षणिक कार्यभार वाटप करणे.
४. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विविध विभाग, सहशालेय कार्यक्रमांचे वितरण करणे.
५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विविध समित्यांचे गठण करून त्यावर विद्यार्थी प्रतिनिधींची नियुक्ती करणे.
६. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विविध कृतिसत्रे, प्रात्याक्षिके इ. साठी Budgetting आर्थिक तरतूद नियोजन करणे.
७. प्रलंबित AQAR २०२०-२१ च्या प्रगतीचा आढावा घेणे व त्यातील अडचणींवर चर्चा उपाय शोधणे.
८. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

Dr. S.S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org Email ID: govtiase@gmail.com

Principal & Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ रोजी अंतर्गत गुणवत्ता कक्षात (IQAC Cell) मा. प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष डॉ. एस. एस. मुळे यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ. यु.जे.करवंदे यांनी IQAC अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांचे व उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व त्यानंतर सन २०२१-२२ मधील दिनांक ०१ जुलै २०२२ रोजीच्या अंतिम सभेचे इतिवृत्त व कार्यवृत्त वाचून दाखवण्यात आले. आणि सर्वानुमते ते कायम करण्यात आले.

२. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ च्या Academic Calendar ला मान्यता देण्यात आली.

३. एप्रिल / मे २०२२ ची उन्हाळी परीक्षा ऑगस्ट २०२२ मध्ये संपन्न झाल्याने या परीक्षेच्या निकालाची चर्चा पुढील बैठकीत व्हावी असे ठरले.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांमध्ये बी.एड. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमातील सर्व पेपर्स, प्रात्यक्षिके, कृतिसत्रे व एम.एड. तृतीय सत्राच्या अभ्यासक्रमातील सर्व भाग व महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे वाटप करण्यात आले.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विविध समित्यांचे गठण करण्यात आले व त्यावर विद्यार्थी प्रतिनिधींची नियुक्ती अंतिम करण्यात आली.

६. सन २०२०-२१ या वर्षीचा प्रलंबित AQAR भरण्याबाबत त्या-त्या criteria शी संबंधित प्राध्यापकांनी data तयार असल्याचे सांगितले मात्र तो online भरण्यात अडचणी असल्याचे सांगितले. त्यावर समन्वयक प्रा. करवंदे, प्रा. गायकवाड यांचे सहकार्य घेऊन पुढील सभेत प्रगती अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले.

७. वरील मुद्दा (६) च्या अनुषंगाने विहित वेळेपूर्वी म्हणजेच डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहापर्यंत प्रत्येकाने कार्य पूर्ण करून AQAR विहित वेळेत सादर करावा. तसेच AQAR २०२१-२२ ची माहिती डिसेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात पूर्ण करावे असे ठरले.

८. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध कृतिसत्रे, प्रात्यक्षिके यासाठी आर्थिक नियोजन अंतिम करून तरतुदीस मान्यता देण्यात आली.

९. शासनाच्या धोरणाप्रमाणे महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे आणि सर्व स्टाफ चे Digi Locker काढण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात यावी असे ठरले.

१०. IQAC ची पुढील बैठक नोव्हेंबर/डिसेंबर महिन्यात आयोजित करण्यात यावी असे ठरले.

शेवटी मा. अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
प्राचार्य तथा संचालक
Govt. College of Education
Aurangabad.
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३)
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ : सहविचार सभेतील उपस्थित सदस्य

1. डॉ.संजीवनी मुळे. (अध्यक्ष )
2. मा.डॉ. श्री. सतीश देशपांडे (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. प्रा.डॉ.एन.आर.चौंडेकर
4. प्रा.डॉ.बी.पी.सुभेदार
5. प्रा.डॉ.आर.एस.पद्मे
6. प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड
7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.वंदना अंभोरे (ग्रंथपाल)
8. प्रशासनातील व्यक्ती श्री. गणेश चव्हाण (मुख्य लिपिक )
9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक )
10. समाजातील नामनिर्देशित व्यक्ती / प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
11. विद्यार्थी प्रतिनिधी– कु. प्राजक्ता देशमुख (बी.एड.)
12. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. निशा वानखेडे (एम.एड.)
13. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- डॉ. रवी जाधव, व. अधिव्या. DIET
14. उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीमती ज्योती दाशरथी
15. नियोक्ता (Employer) प्रतिनिधी– डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे (शाळा प्रतिनिधी)
16. भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी – डॉ. प्रशांत पगारे, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद
17. IQAC समन्वयक –प्रा. डॉ. यु.जे.करवंदे -

Govt. of Maharashtra

Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

## दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार कार्यवृत्त अहवाल (ATR )

दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ च्या IQAC बैठकीतील ठरल्याप्रमाणे दिनांक ३०/०९/२०२२ रोजी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी Digi Locker कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाने शहरातील मराठवाडा अध्यापक महाविद्यालयासोबत MOU केलेला असून यानुसार दिनांक ३०/०९/२०२२ च्या Digi Locker च्या कार्यशाळेत मराठवाडा अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्य आणि शिक्षकेतर कर्मचारी देखील सहभागी झाले होते. या कार्यशाळेचा लाभ एकूण १५३ सहभागींनी घेतला.

बैठकीत ठरविल्याप्रमाणे प्राध्यापकांनी आपणाकडे देण्यात आलेल्या AQAR २०२०-२१ संबंधी माहिती data गोळा करण्याचे कार्य पूर्ण केले. नवीन format मध्ये प्रत्यक्ष online माहिती भरण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु केले.

नियोजित आर्थिक तरतुदीनुसार प्रशिक्षणार्थ्यासाठी विविध प्रात्याक्षिके आणि कार्यशाळा यासाठी विविध journals ची छपाई करण्यात आली आणि त्यांचे वितरण करण्यात आले.

अशाप्रकारे दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ च्या IQAC बैठकीतील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

Dr. S.S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

**शाअमविऔ/अंतगुणहमीकक्ष/२०२२-२३/** **दिनांक ०५ डिसेंबर २०२२**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )**
**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)**

## दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका : बैठक-२

१. मागील सभेच्या इतिवृत्तास व कार्यवृत्तास मान्यता देणे.
२. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ द्वितीय वर्षासाठी छात्रसेवाकालाचे नियोजन करणे.
३. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेणे.
४. शैक्षणिक वर्ष २०२२ च्या परीक्षेच्या निकालाचा आढावा घेणे.
५. प्रलंबित AQAR २०२०-२१ च्या online भरलेल्या माहिती / प्रारुपावर चर्चा करून त्यास NAAC कडे online submit करण्यासाठी अंतिम मान्यता देणे.
६. AQAR २०२१-२२ ची माहिती गोळा करण्यासाठी तसेच IDP बाबत नियोजन करणे.
७. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

Dr. S.S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३)
## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक **१० डिसेंबर २०२२** रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षात (IQAC Cell) IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष तथा प्राचार्यांचे अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व तदनंतर मागील सभेचे इतिवृत्त आणि कार्यवृत्त वाचून दाखवण्यात आले व ते कायम करण्यात आले.

२. बी. एड. २०२२-२३ द्वितीय वर्ष छात्रसेवाकालासाठी शासकीय विद्यानिकेतन, शारदा मंदिर कन्या प्रशाला, म.न.पा. हायस्कूल बायजीपुरा, महात्मा फुले हायस्कूल आणि सरस्वती भुवन प्रशाला या शाळात अनुक्रमे प्रा. करवंदे, प्रा. सुभेदार, प्रा. गायकवाड, प्रा. पद्मे आणि प्रा. चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली १०-१२ विद्यार्थी यांचे नियोजन करण्यात आले. याच दरम्यान प्रवेश प्रक्रिया सुरु असताना पीएच. डी. संशोधक आणि एम. एड. प्रशिक्षणार्थी यांना छात्रसेवाकालात सहभागी करून घ्यावे असे ठरले.

३. प्रलंबित AQAR २०२०-२१ चे प्रारूप सदर बैठकीत IQAC समोर मान्यतेस्तव सादर करण्यात आले. हा AQAR किरकोळ दुरुस्तीसह NAAC कडे विहित वेळेत पाठविण्यासाठी आवश्यक त्या पुराव्यांची जुळवाजुळव या महिन्यात करावी असे ठरले.

४. मागील AQAR चे कार्य प्राधान्याने केल्यामुळे चालू AQAR २०२१-२२ चे अपेक्षित कार्य वेळेत होऊ न शकल्याने त्याची तातडीने पूर्तता करावी; तसेच मुदत वाढीसाठी NAAC कडे विनंती करावी असे ठरले.

५. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या परीक्षेच्या निकालाचा आढावा घेण्यात आला. बी.एड.व एम. एड. द्वितीय वर्ष वर्गाचा निकाल ८५% लागला; त्यापैकी 32 विद्यार्थी Distinction मध्ये आणि ११ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले.

६. बी.एड. प्रथम वर्ष वर्गाची दुसरी प्रवेश फेरी दिनांक १३-१६ डिसेंबर २०२२ आणि महाविद्यालय फेरी २३-२७ डिसेंबर २०२२ दरम्यान नियोजित असल्याने त्या संदर्भात गठीत प्रवेश समिती सदस्यांना कर्तव्य व जबाबदाऱ्यांचे वितरण करण्यात आले.

७. UGC मार्गदर्शक तत्वानुसार अल्प व दीर्घ मुदतीचा IDP तयार करावा असे ठरले.

८. ऐन वेळेच्या विषयांतर्गत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे, आरोग्य जाणीव जागृती इत्यादी विषयी उपक्रम/कार्यशाळा आयोजित कराव्यात असे सुचविण्यात आले.

शेवटी मा. अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.श्री.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| IQAC समन्वयक | Dr. S. S. Muley<br>प्राचार्य तथा संचालक |
| शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद | शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद |

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )
## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १० डिसेंबर २०२२ : सहविचार सभेतील उपस्थित सदस्य

1. डॉ.संजीवनी मुळे. (अध्यक्ष )
2. मा.डॉ. श्री. सतीश देशपांडे (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. प्रा.डॉ.एन.आर.चौंडेकर
4. प्रा.डॉ.बी.पी.सुभेदार
5. प्रा.डॉ.आर.एस.पद्मे
6. प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड
7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.वंदना अंभोरे (ग्रंथपाल)
8. प्रशासनातील व्यक्ती श्री. गणेश चव्हाण (मुख्य लिपिक )
9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक )
10. समाजातील नामनिर्देशित व्यक्ती / प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
11. विद्यार्थी प्रतिनिधी– कु. प्राजक्ता देशमुख (बी.एड.)
12. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. निशा वानखेडे (एम.एड.)
13. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- डॉ. रवी जाधव, व. अधिव्या. DIET
14. उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीमती ज्योती दाशरथी
15. नियोक्ता (Employer) प्रतिनिधी– डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे (शाळा प्रतिनिधी)
16. भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी – डॉ. प्रशांत पगारे, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद
17. IQAC समन्वयक –प्रा. डॉ. यु.जे.करवंदे

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )**
**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

## दिनांक १० डिसेंबर २०२२ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा कार्यवृत्त ATR अहवाल :

दिनांक १० डिसेंबर २०२२ च्या IQAC बैठकीतील ठरावाप्रमाणे सन २०२०-२१ चा प्रलंबित AQAR दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी NAAC कडे online पाठविण्यात आला आणि काही कालावधी नंतर तो स्वीकृत झाल्याचे NAAC च्या वेबसाईट वर दिसून आले. त्यानंतर लगेचच AQAR २०२१-२२ चे कार्य हाती घेण्यात आले.

डिसेंबर २०२२ मध्ये एम.एड. प्रथम वर्ष आणि बी.एड. प्रथम वर्ष या वर्गांच्या प्रवेश समितीमार्फत CET Cell, Govt of Maharashtra आणि उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या निर्देशानुसार वैधानिक – सामाजिक आरक्षणाचे तसेच प्रवेश प्रक्रियेच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करत अत्यंत पारदर्शकपणे प्रवेश प्रक्रिया संपन्न करण्यात आली.

बैठकीतील कार्य-विभाजनाप्रमाणे सर्व प्राध्यापकांनी विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचा कार्यभार स्विकारून अनुषंगिक कार्यवाही केली.

१० डिसेंबर २०२२ च्या बैठकीतील ऐनवेळी आलेल्या विषयानुसार महाविद्यालयात दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी अंधश्रद्धा निर्मुलन समिती औरंगाबाद यांचे संयुक्त विद्यमाने सर्व प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी "वैज्ञानिक दृष्टीकोन" आणि "मैत्री गृह ताऱ्यांशी" या विषयांवर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी प्रा. डॉ. अजित खोजरे, विवेकानंद महाविद्यालय औरंगाबाद आणि श्री. दिपक खंडागळे, अंनिस जिल्हा प्रधान सचिव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. करवंदे यु. जे., विज्ञान विभाग प्रमुख यांनी केले.

त्याचप्रमाणे दिनांक ०१ मार्च २०२३ ते १३ मार्च २०२३ दरम्यान योग आणि आरोग्य जाणीव जागृती प्रमाणपत्र कोर्स चे नियोजन करण्यात येऊन त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली.

अशा प्रकारे १० डिसेंबर २०२२ च्या IQAC च्या बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

Dr. S.S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

**NAAC "A" Grade Re-accredited**

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

शाअमविऔ/अंतर्गतगुणवत्ताहमीकक्ष/२०२२-२३/ दिनांक : ०३ मार्च २०२३

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद.**
**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)**
**(शैक्षणिक वर्ष २०२२-२३ : बैठक-३)**

## दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका

१. मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.
२. त्यानुसार कार्यवृत्तास (Action Taken Report ATR) मान्यता देणे.
३. बी.एड. व एम.एड. प्रथम वर्ष २०२२-२३ च्या प्रवेशाचा अहवाल समोर ठेवणे.
४. बी.एड. व एम.एड. प्रथम वर्ष २०२२-२३ वर्गांच्या अभ्यासक्रमानुसार विविध कृतिसत्रे / शैक्षणिक उपक्रमांच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.
५. बी.एड. (द्वितीय वर्ष) वर्गाच्या स्नेहसंमेलन समारंभाचे नियोजन करणे.
६. AQAR 2021-22 चा आढावा घेणे.
७. विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे पदवी वाटप समारंभाचे नियोजन करणे.
८. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

Dr. S.S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr.S.S.Muley Website: iaseaurangabad.org. Email : govtiase@gmail.com

Principal & Director Off-Tele-Fax: 0240-2334840 , R- 2334141

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ )**
**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)**

## दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे (IQAC Cell) मा. प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत विषय पत्रिकेनुसार चर्चा करण्यात आली आणि खालील प्रमाणे ठराव घेण्यात आले.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले व तद्नंतर १०/१२/२०२२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवण्यात आले व त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
२. मागील बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ATR सादर करण्यात आला.
३. बी.एड. सन २०२२-२३ साठी क्षमतेनुसार प्रथम वर्ष वर्गात संपूर्ण ५० प्रवेश संपन्न झाले; आणि EWS संवर्गासाठी ५ पैकी ३ प्रवेश संपन्न झाले. मात्र एम.एड. वर्गासाठी ५० पैकी ०२ प्रवेश संपन्न होऊ शकले; आणि EWS संवर्गासाठी एकही उमेदवार उपलब्ध झाला नाही. सर्वत्रच एम.एड. प्रवेशाची परिस्थिती अशा प्रकारची असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.
४. मागील बैठकीतील ठरावाप्रमाणे AQAR २०२०-२१ दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी NAAC कडे online पाठविण्यात आल्याचे बैठकीत सदस्यांना अवगत करण्यात आले. त्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त करून पुढील AQAR २०२१-२२ लवकरात लवकर पूर्ण करून NAAC कडे सादर करावा असे ठरले. तसेच त्यानंतर IIQA ३१ मार्च २०२३ पर्यंत सादर करावा यादृष्टीने SSR ची तयारी करावी असे ठरले.
५. एम.एड. व बी.एड. प्रथम वर्ष २०२२-२३ च्या वर्गांचे उद्बोधन सत्र तसेच नियोजित (AC) दिनदर्शिकेनुसार अध्यापनशास्त्रीय चित्रकला कृतिसत्र, हस्तकला कृतिसत्र, शैक्षणिक साहित्य

निर्मिती कृतिसत्र, सूक्ष्म-अध्यापन कृतिसत्र इत्यादी कृतिसत्रे / शैक्षणिक उपक्रमांची कार्यवाही संपन्न करण्यात आली.

६. विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांना दिनांक १८ मार्च २०२३ रोजी पदवी प्रमाणपत्र वाटप समारंभाचे नियोजन करण्यात आले प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण तज्ञ श्रीमती साधना शाह यांना बोलवावे असा ठराव घेण्यात आला.

७. महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन दिनांक २०-२४ मार्च २०२३ दरम्यान आयोजित करावे असे ठरले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. समाधान इंगळे यांना बोलवावे असे ठरले. या संदर्भात विविध समित्यांचे गठण करण्यात येऊन त्यांना जबाबदारीचे वाटप करण्यात आले.

८. ऐन वेळचा विषय म्हणून, कोविड काळात प्रकाशित न होऊ शकालेला शिल्पकारचा सन २०२०-२२ आणि सन २०२१-२३ या तुकड्यांचा जोड-अंक प्रकाशित करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

९. प्रशिक्षणार्थ्यांसाठी दिनांक ०१ मार्च २०२३ पासून योग आणि आरोग्य जाणीव जागृती प्रमाणपत्र कोर्स सुरु करण्यात आल्याचे बैठकीत निवेदन करण्यात आले. याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून दिनांक १३ मार्च २०२३ ला कोर्स पूर्ण झाल्यावर त्यांना प्रमाणपत्र प्रदान केले जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

१०. ऐन वेळचा विषय म्हणून Icon centre for child development & assisted learning या संस्थेशी महाविद्यालयाचा MOU झालेला असून त्यांचे सहकार्याने काही कार्यक्रम घेण्यात यावे असे सुचवण्यात आले.

शेवटी IQAC ची पुढील सहविचार सभा जून २०२३ मध्ये आयोजित करण्यात यावी, असे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी नमूद केले आणि त्यांच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३)
## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

दिनांक ०८ मार्च २०२३ : सहविचार सभेसाठी उपस्थित सदस्य

1. डॉ.संजीवनी मुळे. (अध्यक्ष )
2. मा. डॉ. श्री. सुरेंद्रजी ठाकुर (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. प्रा.डॉ.एन.आर.चौंडेकर
4. प्रा.डॉ.बी.पी.सुभेदार
5. प्रा.डॉ.आर.एस.पद्मे
6. प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड
7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.वंदना अंभोरे (ग्रंथपाल)
8. प्रशासनातील व्यक्ती श्री. गणेश चव्हाण (मुख्य लिपिक )
9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक )
10. समाजातील नामनिर्देशित व्यक्ती / प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
11. विद्यार्थी प्रतिनिधी– कु. प्राजक्ता देशमुख (बी.एड.)
12. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. निशा वानखेडे (एम.एड.)
13. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- डॉ. रवी जाधव, व. अधिव्या. DIET
14. उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीमती ज्योती दाशरथी
15. नियोक्ता (Employer) प्रतिनिधी– डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे (शाळा प्रतिनिधी)
16. भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी – डॉ. प्रशांत पगारे, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद
17. IQAC समन्वयक –प्रा. डॉ. यु.जे.करवंदे

# दिनांक ०८ मार्च २०२३ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा कार्यवृत्त ATR अहवाल :

दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी संपन्न झालेल्या IQAC च्या बैठकीतील ठरावाप्रमाणे AQAR २०२१-२२ पूर्ण करून सर्व पुराव्यांसह NAAC कडे online सादर करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करण्यात आली. बी.एड. व एम.एड. वर्गाचे अध्यापन कार्य व प्रात्यक्षिके व्यवस्थित पूर्ण करून उन्हाळी सुट्ट्यात कार्य करून AQAR २०२१-२२ NAAC कडे दिनांक १९ मे २०२३ रोजी online सादर करण्यात आला. AQAR सादर करण्यात द्यावा लागलेल्या कालावधीमुळे SSR आणि IIQA साठी पुरेसा वेळ उपलब्ध होऊ शकला नाही.

बैठकीतील ठरावाप्रमाणे दिनांक १८ मार्च २०२३ रोजी एका दिमाखदार सोहळ्यात यशस्वी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिक्षण तज्ञ श्रीमती साधना शाह यांनी भावी शिक्षकी जीवनासाठी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे facebook live प्रक्षेपण करण्यात आले.

दिनांक २० ते २४ मार्च दरम्यान महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. समाधान इंगळे यांनी आपल्या काव्य गायनातून भावी शिक्षकांना संवेदनशिलतेचे महत्व व शिक्षकांच्या जबाबदारीची जाणीव प्रशिक्षनार्थ्यांना करून दिली.

बैठकीतील ठरावाप्रमाणे ०१ मार्च २०२३ पासून सुरु झालेल्या योग आणि आरोग्य जाणीव जागृती प्रमाणपत्र कोर्सचा दिनांक १३ मार्च २०२३ ला समारोप झाला. या प्रसंगी सहभागींना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. त्याला जोडूनच Icon centre for child development & assisted learning या संस्थेशी महाविद्यालयाचा MOU झालेला असून त्यांचे सहकार्याने दिनांक १८ मार्च २०२३ रोजी Post COVID issues among school going children या विषयावर पालक, शिक्षक, प्राध्यापक, नागरीक यांच्यासाठी एक दिवसीय symposium/Panel discussion आयोजित करण्यात आले.

याचप्रकारे Icon centre for child development & assisted learning आणि महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने मार्च व एप्रिल २०२३ मध्ये दर शनिवार-रविवार ३० तासांचा/ ८ दिवसांचा Certificate course in Basic training in learning disorders & remedial

education या विषयीचा certificate course आयोजित करण्यात आला. ज्यात पालक, शिक्षक, प्राध्यापक, counsellors आणि पदवीधर इ. सहभाग घेतला होता.

दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयाच्या विद्यमान प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने प्राचार्य पदाचा प्रभार नूतन प्राचार्या डॉ. नलिनी चोन्डेकर यांनी स्विकारला. या प्रसंगी डॉ. संजीवनी मुळे यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. तसेच याप्रसंगी महाविद्यालच्या शिल्पकार या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

विद्यापीठाचे संभाव्य Annual Exam Schedule लक्षात घेता साधारणत: जून २०२३ मध्ये घेता येईल अशाप्रकारे पुढील बैठकीचे नियोजन करण्यात आले.

अशा प्रकारे IQAC बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. N. R. Chondekar Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840 R- 2334141

शाअमविऔ/अंतर्गतगुणवत्ताहमीकक्ष/२०२२-२३/ दिनांक : १२ जून २०२३.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद.**

**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

**(शैक्षणिक वर्ष २०२२-२३ : बैठक-४)**

**दिनांक १६ जून २०२३ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका**

१. मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

२. त्यानुसार कार्यवृत्तास (Action Taken Report ATR) मान्यता देणे.

३. बी.एड. व एम.एड. प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष २०२२-२३ च्या अभ्यासक्रमाची पूर्तता, अंतर्गत मूल्यमापन इ.चा आढावा घेणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे संभाव्य परीक्षा केंद्र यादृष्टीने परीक्षा केंद्राच्या विविध जबाबदाऱ्यांचे वाटप व नियोजन करणे.

५. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

**NAAC "A" Grade Re-accredited**

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr.N.R. Chondekar Website: iaseaurangabad.org. Email : govtiase@gmail.com

Principal & Director Off-Tele-Fax: 0240-2334840 , R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३)
## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १६ जून २०२३ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक १६ जून २०२३ रोजी अंतर्गत गुणवत्ता कक्षाद्वारे (IQAC Cell) सर्व प्रथम नूतन प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष डॉ. नलिनी चोंन्डेकर यांचे स्वागत करण्यात आले व त्यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत विषय पत्रिकेनुसार चर्चा करण्यात आली आणि खालील प्रमाणे ठराव घेण्यात आले.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले.
२. त्यानंतर दिनांक ०८/०३/२०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ATR वाचून दाखवण्यात आले व त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
३. सन २०२२-२३ ची विद्यापीठ परीक्षेचे केंद्र येण्याची शक्यता लक्षात घेता प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना पद व जबाबदाऱ्या वाटप करणे, बैठक व्यवस्था इ. बाबींचे नियोजन करण्यात आले.
४. जून २०२३ मध्ये विद्यापीठाच्या (एप्रिल/मे २०२३ च्या) उन्हाळी परीक्षा नियोजित असल्याने बी.एड. व एम.एड. वर्गाच्या तात्विक भागाचे अध्यापन आणि प्रात्यक्षिक भाग समाधानकारकपणे संपन्न झाले आणि विद्यापीठ निकषानुसार अंतर्गत मूल्यमापन पूर्ण झाले. असे संबंधित विभागप्रमुखांनी स्पष्ट केले.

५. ऐन वेळचा विषय म्हणून चालू वर्षाच्या AQAR चे कार्य आणि SSR चे कार्य सोबत करून डिसेंबर २०२३ पर्यंत कार्यवाही पूर्ण होईल यासाठी प्रयत्न करावे असा निर्णय घेण्यात आला.

६. पुढील वर्षीची पहिली बैठक परीक्षा झाल्यानंतर ऑगस्ट २०२३ मध्ये घ्यावी असे ठरले.

शेवटी मा.अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| IQAC समन्वयक | प्राचार्य तथा संचालक |
| शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद | शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद |

Principal
Govt. College of Education
Aurangabad

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२२-२३)**
**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

दिनांक १६ जून २०२३ : सहविचार सभेसाठी उपस्थित सदस्य

1. डॉ.एन.आर.चौंडेकर. (अध्यक्ष )
2. मा.डॉ. श्री. सुरेंद्रजी ठाकुर (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. प्रा.डॉ.बी.पी.सुभेदार
4. प्रा.डॉ.आर.एस.पद्मे
5. प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड
6. प्रशासनातील व्यक्ती श्री. नितीन घोडके (अधीक्षक)
7. प्रशासनातील व्यक्ती श्री. गणेश चव्हाण (मुख्य लिपिक )
8. प्रशासनातील व्यक्ती श्री. यादव किसवे (वरिष्ठ लिपिक )
9. समाजातील नामनिर्देशित व्यक्ती / प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
10. विद्यार्थी प्रतिनिधी– कु. प्राजक्ता देशमुख (बी.एड.)
11. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. निशा वानखेडे (एम.एड.)
12. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- डॉ. रवी जाधव, व. अधिव्या. DIET
13. उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीमती ज्योती दाशरथी
14. नियोक्ता (Employer) प्रतिनिधी– डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे (शाळा प्रतिनिधी)
15. भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी – डॉ. प्रशांत पगारे, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद
16. IQAC समन्वयक –प्रा. डॉ. यु.जे.करवंदे

# दिनांक १६ जून २०२३ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा कार्यवृत्त ATR अहवाल :

दिनांक १६ जून २०२३ ची IQAC बैठक ही शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची अंतिम बैठक असल्याने त्यात प्रामुख्याने संपन्न झालेल्या वर्षाचा आढावा घेणे, हे प्रमुख कामकाज झाले. तसेच त्यात झालेल्या अन्य ठरावाप्रमाणे AQAR २०२२-२३ च्या कार्याला गती देण्यासाठी प्राध्यापकांना कामाचे वितरण करण्यात आले.

विद्यापीठाच्या (एप्रिल/मे २०२३ च्या) उन्हाळी परीक्षा विद्यापीठाच्या निकषानुसार व जून २०२३ च्या बैठकीतील नियोजनानुसार दिनांक ३० जून २०२३ पासून सुरु होऊन वेळापत्रकाप्रमाणे संपन्न झाली.

तसेच साधारणत: ऑगस्ट २०२३ मध्ये घेता येईल अशाप्रकारे IQAC च्या पुढील वर्षीच्या पहिल्या बैठकीचे नियोजन करण्यात आले.

अशा प्रकारे १६ जून २०२३ च्या IQAC च्या बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad